महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
आयुक्त, अर्थ व सांख्यिकी,
नवीन प्रशासन भवन, १८ वा माळा,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
ईमेल : commissioner.es@maharashtra.gov.in

**डाक नोंदणी पोच देय**

क्र. मलोआ/लिटं/नियुक्ती/२०२५/१८७/प्रशा-२/११५७ दिनांक:- २४/०९/२०२५

**कार्यालयीन आदेश**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या **महाराष्ट्र गट - क २०२३** या परीक्षेतील शिफारशीअंती खालील नमूद केलेल्या उमेदवारांचे लिपिक टंकलेखक, गट - क या पदासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयास नियतवाटप केले आहे. त्या अनुषंगाने त्यांची **अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई** येथे गट-क मधील लिपिक-टंकलेखक या रिक्त पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातून **S-६: १९९००-६३२००** अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते या वेतनश्रेणीत खालील सेवाशर्तीच्या अधीन राहून निव्वळ अस्थायी स्वरूपात नियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग | ज्या कार्यालयात पदस्थापना करण्यात आली ते कार्यालय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. मनिष विनायक कुडे<br>दुर्गास्मृती, कुडेवाडा, मातोश्री हॉस्पिटल जवळ, वडगाव मावळ, पुणे – ४१२१०६ | इमाव | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, मुंबई उपनगर**<br>प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ |
| २ | श्री. देवदिप प्रकाश आठवले<br>गौतम नगर, शिवणी, NH.५३/६ जवळ, अकोला – ४४४००१ | अजा | **अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई**<br>प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ |
| ३ | श्री. रविंद्र तानाजी कोरडे<br>C-१०४, सहयोग निलंयम, मांदा, टिटवाळा (प.), ठाणे – ४२१६०५ | अज | **अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई**<br>प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ |

**सेवाशर्ती**

१. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा-२०२३ साठी देण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक : १११/२०२३, दिनांक १३/१०/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार वयोमर्यादेची दिनांक ०१/०५/२०२३ रोजीच्या अर्हतेनुसार तसेच शैक्षणिक आणि अन्य अटींच्या अर्हतेनुसार सदर नियुक्ती उमेदवाराने केलेल्या दाव्यांच्या पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. सदर दावे पडताळणी केल्यानंतर उमेदवार अपात्र ठरल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२. नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित राहताना खाली नमूद केलेली मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी सोबत घेऊन यावीत. नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित राहताना सदर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रत उमेदवाराजवळ असणे अत्यावश्यक आहे.

१. **वयोमर्यादा** :- दिनांक ०१/०५/२०२३ रोजीची

| | |
|---|---|
| (अ) अमागास | : किमान १९ वर्षे असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| (आ) अमागास खेळाडू | : किमान १९ वर्षे असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| (इ) मागासवर्गीय/ अनाथ/ आ.दु.घ. | : किमान १९ वर्षे असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| (ई) मागासवर्गीय खेळाडू | : किमान १९ वर्षे असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| (उ) अमागास माजी सैनिक | : कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे + सेवेचा कालावधी + ३ वर्षे |
| (ऊ) मागासवर्गीय माजी सैनिक | : कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे + सेवेचा कालावधी + ३ वर्षे |
| (ए) दिव्यांग/ प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त/ पदवीधर अंशकालीन कर्मचारी | : किमान १९ वर्षे असावे व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. |

२. **अधिवास** : मुख्य परीक्षेच्या जाहिरात क्रमांक १११/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार.

३. **शैक्षणिक पात्रता** : सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही तत्सम अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक.

४. **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र** : प्रस्तुत मुख्य परीक्षेची जाहिरात दिनांक १३/१०/२०२३ रोजी विज्ञापित केलेली आहे. त्यामुळे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र जाहिरात विज्ञापित झालेल्या वित्तीय वर्षापूर्वीच्या (एप्रिल ते मार्च) वित्तीय वर्षातील म्हणजेच **दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षापासून असावे.**

५. नियतवाटप करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे दावे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून तसेच अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती / जमातीचे दावे नियुक्तीपूर्वी संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून तपासणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

६. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), वि.मा.प्र. व इतर मागासवर्ग तसेच अमागास (महिला) या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहित नमुन्यातील (NCL) प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

७. मागासवर्गीय असल्यास जाती / जमातीबद्दल विहित नमुन्यात आणि विहित अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी दिलेले जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत सादर करण्याच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

८. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: एसपीई १०१२/ (१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१.१०.२०१३ नुसार अथवा तद्नंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली

संगणक टंकलेखक अर्हता - बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स् इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे. सदर अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

२. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३.०६.२०१९ व संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का-५२, दिनांक ३०.०५.२०२३ नुसार शासकीय वाणिज्य संस्थेचे विहित वेगाच्या टंकलेखनाचे प्रमाणपत्र शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी शासनाला सादर करण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. तथापि सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास, उपरोक्त नमुद शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांबाबत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. आरटीए १०९०/प्र.क्र.२२२/ ९१/२८, दिनांक ३०.१२.१९९१ मधील तरतूदींची पूर्तता होत असेल तरच त्यांना नियुक्ती देण्यात येईल. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. आरटीए-१०८२-३५०२-सीआर-१००-१६-अ, दिनांक ०२.०९.१९८३ नुसार माजी सैनिक वर्गवारीचा दावा केलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या माजी सैनिक वर्गवारीचा दाव्याच्या तपासणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३. माजी सैनिक या समांतर आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१४/(प्र.क्र.३६४/१४)/२८, दिनांक ०३/०६/२०१६ मधील तरतुदींनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयात प्रथम नियुक्ती स्विकारताना उमेदवाराने ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेले आहेत, त्याबाबतची दिनांकानिहाय सविस्तर माहिती स्वत:च्या स्वाक्षरीने लेखा स्वयंघोषणापत्राच्या स्वरुपात संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

४. अर्थ व सांख्यिकी संचालनालयात नियुक्तीपूर्वी जर उमेदवार राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालयात माजी सैनिक आरक्षणाचा लाभ घेऊन कार्यरत असल्यास सदर पदावर रुजू होतांना दिलेल्या स्वयंघोषणापत्राची प्रत अर्थ व सांख्यिकी संचालनालयात रुजू होताना सादर करावी. सदर स्वयंघोषणापत्रात महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षा-२०२३ लिपिक-टंकलेखक पदाचा समावेश असल्यास उमेदवार नियुक्तीस पात्र राहील अन्यथा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-आरटीए १०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८, दिनांक ३०/१२/१९९१ मधील तरतूदी लागु राहतील.

५. महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४/०५/२०२३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार अराखीव (महिला) आरक्षित पदावरील निवडीसाठी, अराखीव (महिला) तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

६. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १३.०८.२०१४ व दिनांक १९.१२.२०१८ तसेच अन्य अद्यावत शासन निर्णयामधील तरतूदीआधारे सदर लिपिक-टंकलेखक शिफारशी करण्यात आल्या असल्याने, शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेल्या सूचना विचारात घेता लिपिक टंकलेखक (मराठी / इंग्रजी) पदाकरीता अमागास समांतर आरक्षित [अमागास (खेळाडू), अमागास (माजी सैनिक)] पदावर शिफारसपात्र ठरलेले उमेदवार हे प्रत्यक्षात खुल्या (अराखीव) प्रवर्गातीलच उमेदवार आहेत याची त्यांच्या शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याआधारे तसेच अन्य तद्नुषंगिक दस्तऐवजाआधारे नियुक्तीपूर्वी खात्री व पडताळणी करणे आवश्यक आहे.

७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६.१२.२०१६ अन्वये शासन सेवेत दिव्यांगांसाठी आरक्षित असलेल्या लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना लिपिक-टंकलेखक (इंग्रजी/मराठी) टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात आली आहे. यास्तव, दिव्यांगांसाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारसपात्र उमेदवारांच्या बाबतीत त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६.०५.२००७ मधील सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

९. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांच्याबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि. १८.५.२०१३ मध्ये नमूद सूचनांनूसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जाती वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे. नसल्यास त्याने जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मध्ये विहित मुदतीत जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास सदर उमेदवाराची सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

१०. लिपिक-टंकलेखक पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांकडे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पूरकपत्र क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता आवश्यक आहे. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सदर प्रमाणपत्र/अर्हता उमेदवारांकडे नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून दोन वर्षाच्या आत उमेदवाराने उपरोक्त शासन निर्णयातील नमूद संस्थेचे संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहित कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्रमांक एसआरव्ही -२०१७/प्र.क्र.४६२/का-१२, दिनांक २८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

११. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.१/कार्यासन-१२, दिनांक १२/०१/२०२३ नुसार केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपिक-

टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. तसेच केवळ मराठी टंकलेखन धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. अन्यथा संबंधितांची वेतनवाढ रोखण्यात येईल.

१२. हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर शिफारसप्राप्त उमेदवार अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्याला सदरहू परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, उमेदवारांना ती परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१३. उमेदवारांच्या पूर्व-चारित्र्याची पडताळणी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. चापअ १००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दिनांक ०९.०१.२००९ मधील तरतुदी विचारात घेऊन पोलीस विभागाकडून करुन घेण्यात येईल. **"प्रस्तुत उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या पूर्व-चारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे त्यांची नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली आहे व सेवासमाप्ती पूर्वसूचना न देता करण्यात येईल."** उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणी संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. चापअ-१०१२/प्र.क्र.६३/१६-अ, दिनांक २६.०८.२०१४ मधील सूचनादेखील विचारात घेण्यात येतील.

१४. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे उन्नत व प्रगत गटात (क्रीमिलेयर) मोडत नसल्याचे **दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षातील** प्रमाणपत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ३०.०६.२००६ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार तपासण्यात येईल. तसेच, यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/ विजाभज-१, दिनांक २४.०६.२०१३ अन्वये विहित केलेली तरतूद विचारात घेण्यात येईल.

१५. समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालय / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सरळसेवा लिपिक टंकलेखक (मराठी / इंग्रजी) मुख्य परीक्षा २०२३ मधून उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रस्तुत परीक्षेच्या मुळ यादीच्या निकालाआधारे उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे केल्या आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास अधिसुचनेतील तरतुदीनुसार दावे तपासताना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधीत उमेदवारांची उमेदवारी / शिफारस कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१७. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : टीआरएन-२०१४/३४२/ प्र.क्र.५०/ १४/१२-अ, दिनांक २७.०५.२०१४ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : कअप-२०१४/प्र.क्र.६५/१४-ब, दिनांक १३.०५.२०१५ व शासन अधिसूचना क्रमांक : टीआरएन-२०११/प्र.क्र.२८४/११/१२-अ, दिनांक ०२.०२.२०२२ नुसार सर्व संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणानुसार (पायाभूत) प्रशिक्षण अनिवार्य आहे. त्यानुसार प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांनी प्रशिक्षणासाठी सक्तीने उपस्थित राहणे गरजेचे आहे.

१८. अनाथांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ व दिनांक १०/०५/२०२३ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

१९. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील व विहित कालावधीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यापूर्वी नियुक्ती देण्यात येत असल्याने सदर नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली आहे व सेवासमाप्ती पूर्वसुचना न देता करण्यात येईल.

२०. लिपिक- टंकलेखकांची पदे ही महाराष्ट्र राज्यातील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या बृहन्मुंबईतील विविध शासकीय कार्यालयातील असल्याचे प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीत स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे उमेदवारांची अन्य जिल्ह्यातील नियुक्ती देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही व या संदर्भातील अर्जाची दखल घेतली जाणार नाही. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१८ /व्ही.आय.पी.६७ /प्र.क्र.२०७/कार्या-१२, दिनांक २८.०५.२०१८ नुसार उमेदवारांनी सदर नियुक्ती विहीत मुदतीत स्विकारणे आवश्यक असून या संदर्भात उमेदवारांच्या मुदतवाढीच्या विनंती अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

२१. जर उमेदवारांना नोकरी सोडावयांची असेल तर त्यांनी एक महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची आगाऊ लेखी सूचना द्यावी अन्यथा त्यांना त्यांच्या एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम सरकार जमा करावी लागेल.

२२. सदरची नेमणूक वैद्यकिय तपासणीमध्ये शारीरिक दृष्ट्या पात्र असण्याच्या प्रमाणपत्रावर अवलंबून राहील.

२३. लिपिक टंकलेखक पदासाठी सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम २००६ नुसार विहित केलेली विभागीय परीक्षा त्यांना विहित संधीत उत्तीर्ण व्हावी लागेल अन्यथा संभाव्य परिणाम उक्त नियमातील नियम ६ नुसार विनियमित होतील.

२४. वरील उमेदवारांची नियुक्ती दिनांक ०१.११.२००५ नंतरची असल्याने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :अनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अनुसार त्यांना **अंशदान निवृत्तीवेतन योजना** (Defined Contribution Pension Scheme) लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

२५. लिपिक टंकलेखक पदावर रुजू होण्यापूर्वी जर एखादया उमेदवाराने राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगर पालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालये इ. यामधील विविध पदांसाठी अर्ज केले असतील तर त्यांना शासकीय सेवेचा राजीनामा स्विकारण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक ०२.१२.१९९७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२६. वरील गोष्टींना मान्यता दिल्यानंतर त्यांना नोकरनाम्यावर तसेच निष्ठा शपथेवर स्वाक्षरी करावी लागेल.

२७. सदर उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तदनंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास त्यात फेरबदल करता येणार नाही.

२८. सदरची नियुक्ती यादी ही सेवा ज्येष्ठता यादी नसून उमेदवारांची सेवाज्येष्ठता नियुक्ती प्रक्रीया पुर्ण झाल्यावर निश्चित करण्यात येईल.

२९. लिपिक टंकलेखक पदावरील अस्थायी नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित रहाण्याकरीता लागणारा प्रवास खर्च उमेदवाराने स्वत:च सोसावयाचा आहे.

३०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ., दिनांक ११/०८/२०२५ मधील तरतूदीनुसार समांतर आरक्षण/जात वैधता पडताळणी/इतर कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहून सदर नियुक्ती देण्यात येत आहे. तपासणी/ पडताळणी अंती तफावत आढळल्यास किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधीत उमेदवारांची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३१. उपरोक्त उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून **तीस दिवसांच्या आत** नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावे.या कालावधीत ते/त्या रुजू न झाल्यास त्यांची लिपिक-टंकलेखक, गट-क पदावरील नियुक्ती रद्द समजण्यात येईल व त्यांचा अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील नोकरी मिळण्याचा हक्क आपोआपच संपुष्टात येईल.

डॉ. ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से)
आयुक्त
अर्थ व सांख्यिकी, मुंबई.

प्रति,

---------------------------------------

---------------------------------------

---------------------------------------

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (प्रशा-३) का-१४ अ, मंत्रालय, मुंबई.
४. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई.

प्रत :

१. अपर संचालक (सर्व) []
२. सह संचालक (सर्व) []
३. प्रशासन शाखा-१/२/३/४ []
४. प्रशिक्षण शाखा - नवनियुक्त लिपिक टंकलेखक यांचे प्रशिक्षणाचा कार्यक्रम सादर करावा. []
५. ज्येष्ठतासूची कार्यासन (प्रशा-२) []
६. सेवापुस्तक कार्यासन (प्रशा-४) []
७. संगणक मुख्य नोंदवही (प्रशा-२) []
८. लिपिक टंकलेखक संवर्ग कर्मचरी (प्रशा-२) []
९. निवड नस्ती []

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुख्य कार्यालय, मुंबई.